आरोग्य विभाग जिल्हा परिषद रत्नागिरी
१) आवक तारीख 19 JAN 1994
२) विभाग शाखा
३) आवक क्रमांक
पर्यवेक्षक/प्र. अ./अति. जि. आ. अ./जि./आ. अ.

274

अ. शा. पत्र क्रं. संआसे/निविमू/प्राआकें/नपा/स्थलांतर/
टी-७/कक्ष-७/९३

डॉ. ना. सि. वानेरे

सहसंचालक [निविमू]

संचालनालय आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य,
मुंबई-४०० ००१. दिनांक: १३ जानेवारी १९९४.

विषय:- महानगरपालिकेच्या क्षेत्रात येणारी प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र स्थलांतर करणेबाबत...

संदर्भ:- शासन सा. आ. वि. पत्र क्रं. संकीर्ण/१०९३/३३४९/ सीआर-३७३/आ-४ दिनांक २८. १०. १९९३...

प्रिय डॉ. पोळ

नगरपालिका क्षेत्रात येणारी, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे नगरपालिकेकडे हस्तांतरण करण्याची मागणी असल्यास ही प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रे नगरपालिकेकडे हस्तांतर करण्यासाठी शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभागाने काही मार्गदर्शक तत्वे निश्चित आहे., ती पुढीलप्रमाणे.

१] प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे नगरपरिषदेला हस्तांतर करण्यापूर्वी संबंधित नगरपालिकेने/जिल्हा परिषदेने स्थलांतराचे ठराव मान्य करणे आवश्यक आहे.

२] प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र-तील कर्मचारी नगरपालिकेकडे जाण्यास तयार असल्यास त्यांचा विकल्प घेणे आवश्यक आहे. जे कर्मचारी नगरपालिकेकडे जाण्यास तयार नसतील अशा कर्मचा-यांना जिल्हा परिषद इतरत्र सामावून घेणार किंवा कसे याबाबतची माहिती.

३] हस्तांतर करण्यास प्रस्तावित केलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राची व उपकेंद्राची मालमत्ता व साधन सामुग्री इत्यादीची सविस्तर यादी त्याची प्रत्येकी किंमत नमूद करावी.

४] मालमत्तेच्या यादीपैकी जिल्हा परिषद/ पंचायत समिती यांनी स्वत:च्या निधीतून संपादीत केलेल्या मालमत्तेच्या अथवा बांधण्यात आलेल्या इमारती नगरपालिकेकडे वर्ग करण्यापूर्वी जिल्हा परिषद/ पंचायत समिती यांना त्यांची किंमत नगरपालिकेने द्यावी.

५] नगरपालिका क्षेत्रात येणा-या प्राथमिक आरोग्य केंद्रात तसेच उपकेंद्रातील कर्मचा-यांची मंजूर पदे भरलेली पदे व रिक्त पदे यांची माहिती.

..२..

आपल्या जिल्हयातील नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्रे नगरपालिका/महानगरपालिका यांना हस्तांतर करण्याची मागणी आल्यास ग्रामविकास विभागाने तयार केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रस्ताव तयार करावा.

कृपया या पत्राची पोच पाठवी.

आपला स्नेहांकित

[ बा. सि. वानेरे ]

प्रति,

डॉ. के. एम. घोळ,

जिल्हा आरोग्य अधिकारी,

जिल्हा परिषद,

रत्नागिरी.

एसजीव्ही २३१२९३

आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
आवक शाखा
दि. 16 JUN 2012
2814
आवक क्र :-........

90 ५०

**राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातंर्गत मंजूर उपकेंद्रे अपरिहार्य कारणामुळे इतरत्र स्थलांतरीत करण्याबाबत.**

PDE - D7A
INWARD NO........ २३३
DATE :........ ८/6/१२
SUPDT AO

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :- उपके-२०११/प्र.क्र.२२६/११/आरोग्य-४**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांकः- २५ मे, २०१२**

वाचा:- १) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र. संआसे/जिपस्तर/उपकेंद्र/स्थलांतर/मार्गदर्शक/टे-७/कक्ष-७अ/११, दि.२३.०८.२०१२

**प्रस्तावना :-**

शासनाने वेळोवेळी राज्यात उपकेंद्राची स्थापना केलेली आहे. परंतु यापैकी काही उपकेंद्राना बांधकामासाठी जागा उपलब्ध झालेली नाही. तसेच महानगरपालिका, नगरपालिका यांच्या हद्दविस्ताराने काही उपकेंद्रे पालिका क्षेत्रात आलेली आहेत. त्याचप्रमाणे काही उपकेंद्रे बुडीत क्षेत्रामध्ये गेलेली आहेत. अशी उपकेंद्रे इतरत्र स्थलांतरीत करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

राज्यातील आरोग्य विभागातंर्गत उपकेंद्रे काही अपरिहार्य कारणामुळे इतरत्र स्थलांतरीत करण्याबाबत शासन खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे विहीत करीत आहे.

१) उपकेंद्राचे मुख्यालय बुडीत क्षेत्रामध्ये येत असेल अथवा सदरचे मुख्यालय ओसाड पडले असल्यास अशा ठिकाणचे उपकेंद्र त्या उपकेंद्राच्या कार्यक्षेत्रातील भौगोलिकदृष्टया योग्य व जास्त लोकसंख्या असलेल्या गावामध्ये स्थलांतर करण्यात यावे.

२) जमिन नाही या कारणामुळे उपकेंद्र बंद असल्यास अथवा स्थापित झाले नसल्यास सदरचे उपकेंद्र रद्द करुन त्या उपकेंद्राच्या कार्यक्षेत्रातील किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रातील योग्य गावामध्ये स्थलांतर करण्याबाबत संबंधित उपसंचालक आरोग्य सेवा व संचालक आरोग्य सेवा यांचे मार्फत प्रस्ताव शासनाला सादर करावा.

३) शहरी भागातील उपकेंद्र हद्द वाढीमुळे शहराच्या कार्यक्षेत्रात येत असल्यास सदरचे उपकेंद्र त्या उपकेंद्राच्या कार्यक्षेत्रातील किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रातील योग्य गावामध्ये स्थलांतर करण्यात यावे.

४) संबधित आरोग्य समिती, जिल्हा नियोजन व विकास मंडळाने उपकेंद्र स्थलांतराबाबत स्थान निश्चितीचा ठराव पारित करणे आवश्यक राहील. तथापि असे आदेश पारित झाले तरी अशा ठिकाणची भौगोलिक स्थिती, त्याची उपयुक्तता, अनुज्ञेयता इत्यादीची पडताळणी उपसंचालक स्तरावर करण्यात यावी व उपकेंद्र स्थलांतराबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव उपसंचालकांमार्फत संचालनालयास पाठवून शासनाची मंजूरी मिळाल्याननंतरच उपकेंद्र स्थलांतरीत करता येईल.

५) उपकेंद्र स्थलांतरीत करताना नियोजित उपकेंद्रातर्गत ज्या गावात स्थापन करण्यात येईल ते ठिकाण त्या उपकेंद्रातर्गत संलग्न असणा-या गावांना सर्वसाधारणपणे मध्यवर्ती असावे.

(क्रमशः)

६) उपकेंद्र शक्यतो गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी, जनतेला सोयीच्या ठिकाणी व बारमाही रस्ते, पाणी विजेची उपलब्धता असलेल्या ठिकाणी असावे.

७) उपकेंद्राची जागा शक्यतो मोफत मिळविण्यात यावी. जागा मोफत उपलब्ध असल्याबाबत संबधित ग्रामपंचायतीची लेखी सहमती घेण्यात यावी. मध्यवर्ती जागा उपलब्ध होत नसल्यास व जिल्हा परिषदेने तसा ठराव मंजूर केल्यास उपकेंद्राची जागा शासनाच्या विहीत पध्दतीने अधिग्रहीत करावी.

८) नियोजित उपकेंद्राचे मुख्यालय निश्चित करताना उपकेंद्राच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट असलेल्या सर्व गावांच्या लोकसंख्येची यादी घटत्या क्रमाने केल्यानंतर ज्या गावाची लोकसंख्या उपकेंदाच्या कार्यक्षेत्रातील सर्व गावापेक्षा जास्त असेल आणि वरील अट क्रमांक ५,६,७ ची पूर्तता करीत असेल अशा गावाची निवड उपकेंद्राचे मुख्यालय म्हणून करण्यात यावी. जर सदर गाव वरील अटींची पूर्तता करीत नसल्यास उरलेल्या गावांपैकी त्यानंतर सर्वात मोठी लोकसंख्या असलेल्या गावांची निवड सदर अटींची पूर्तता करीत असल्यास उपकेंद्राचे मुख्यालय म्हणून करण्यात यावी.

९) अस्तित्वात असलेल्या उपकेंद्रामधील पदे, यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीसहित उपकेंद्राचे स्थलांतर करणे आवश्यक राहील.

१०) प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय असलेल्या गावात उपकेंद्राची स्वतंत्र इमारत बांधण्यात येऊ नये.

११) ज्या ठिकाणी उपकेंद्र स्थलांतरीत होणार असेल त्या ठिकाणी ते पूर्ण सक्षमतेने कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने आवश्यक सर्व सुविधा आहेत याची निश्चिती होणे आवश्यक राहील.

२. उपकेंद्र स्थलांतरीत करण्याबाबत सदरची मार्गदर्शक तत्वे त्वरीत परिणामाने लागू होतील. उपकेंद्र स्थलांतराबाबत यापूर्वी पाठविलेले सर्व प्रस्तावर रद्द समजण्यात यावेत. संचालक आरोग्य सेवा यांनी उपकेंद्र स्थलांतराबाबतचे प्रस्ताव सदर मार्गदर्शक तत्वानुसार तपासून शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

भा. बा. पाटील

(भा.बा.पाटील)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रति,
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व सहसंचालक, आरोग्य सेवा मुंबई /पुणे
सर्व उपसंचालक, आरोग्य सेवा
सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, आरोग्य सेवा
नियोजन विभाग,मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग (व्यय-१३) मंत्रालय, मुंबई
सर्व कक्ष अधिकारी/अवर सचिव/उपसचिव/सहसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (आरोग्य-४ )

D:\data back up\GR-2010\Other GR.lwp

# आरोग्य सेवा संचालनालय
## (महाराष्ट्र राज्य)

" आरोग्य भवन ", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

Website : http://maha-arogya.gov.in
Email : pde.dhs@gmail.com Email : jtpde7a@gmail.com
Tel No. 022-22620249 (Jt. DHS) 022- 22620220 (DDHS) 022-22674480 (AO)


क्र.संआसे/कक्ष-७अ/टे-७/रत्नागिरी/उपस्थलातर/२०१६/2495 दिनांक - 11.०७.२०१६

प्रति,
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, रत्नागिरी

विषय :- राज्यातील महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रांतील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र इतरत्र स्थलांतरीत करणेबाबतची माहिती

संदर्भ :- आपले पत्र क्र. जा.क्र.रजिप/आवि/टी १३/२०१६ दि.०४/०४/२०१६

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्राला अनुसरुन आपणास कळविण्यात येते कि, शासन निर्णय क्र. उपके-२०११/प्र.क्र.२२६/११/आरोग्य -४/ दि.२५/०५/२०१२ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वामध्ये नगरपंचायतीमधील उपकेंद्र स्थलांतरीत करण्याबाबतच्या सुचनांचा अंतर्भाव नसल्यामुळे नगरपंचायत लांजा येथील उपकेंद्र स्थलांतरीत करण्यास संचालनालयाची मान्यता नाही.

आरोग्य विभाग जिल्हा परिषद रत्नागिरी
शाखा T-13
आवक क्रमांक 294
25 JUL 2016
अधीक्षक / क. अ / प्र. अ. /
अति. जि. आ. अ. / जि. आ. अ.

(डॉ. आर.एम.कुंभार)
सहा.संचालक, आरोग्य सेवा,
(प्राआकेंद्र/उपकेंद्र/दवाखाने) मुंबई.

2/20
7/7/16